नि.दावा क्र. ७०/२०१४.

अशोक वि. मुकुंदा .

निशाणी क्र. **७९.**

## वादी तर्फे साक्षीदार क्र.२ यांची साक्ष

मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की,

| | | |
|---|---|---|
| **माझे नाव** | :– | पुरुषोत्तम रामलखन पांडे |
| **वय** | :– | ५२ वर्षे, **धंदा** :– नौकरी |
| **नेमणूक** | :– | नगरपरिषद, सावनेर. |
| **राहणार** | :– | खापा, ता. सावनेर. |

## शपथेवर सरतपासणी वादी तर्फे – श्री. व्ही.डी. मुळे, यांच्यामार्फत सुरु

१. नगरपरिषद, सावनेर यांना आजच्या तारखेचे साक्ष समक्ष् प्राप्त झालेले आहे. साक्ष समक्ष मध्ये अशोक बळीराम चरपे यांच्या बांधकाम परवानगी ची कागदपत्रे सोबत आणण्याचे आदेश प्राप्त झाला होता. त्याप्रमाणे मी सपूर्ण मुळ संचीका सोबत आणली आहे.

२. अशोक चरपे यांना दिनांक ३०/०५/२०१३ रोजी जा.क्र. ६१२ अन्वये बांधकाम प्रारंभ प्रमाणपत्र देण्यात आले. सदर प्रमाणपत्र अर्ज क्र. बी.आर.१२/२०१३–१४ दिनांक १५/०५/२०१३ अन्वये देण्यात आले होते. आज मी सोबत मुळ प्रारंभ प्रमाणपत्र आणले आहे. आता मला वर्णन यादी निशाणी ७२ब/१ वर दाखल असलेली प्रारंभ प्रमाणपत्राची प्रत दाखविण्यात आली त्यावर आमच्या कार्यालयाचा शिक्का आहे व संबंधीत अधिका–यांच्या सह्या आहेत. सदर प्रतीमधील मजकूर मुळ प्रती प्रमाणे बरोबर आहे. त्यास **निशाणी क्र. ८०** देण्यात येते.

३. आता मला निशाणी ७३ वरील मंजूर नकाशाची प्रमाणीत प्रत दाखविण्यात आली. त्यावर आमच्या कार्यालयाच्या शिक्का असून अधिका–यांच्या सह्या आहेत. सदर प्रत मुळ मंजूर नकाशाप्रमाणे बरोबर आहे.

## उलटतपास प्रतिवादी क्र.१ ते ३ तर्फे – श्री. लाहबर, विद्यमान वकील यांच्यामार्फत सुरु

**४** नगरपरिषदेने मला साक्ष देण्याकरिता अधिकारपत्र देण्यात आले नाही. मी सध्या नोकरीवर कनिष्ठ अभियंता म्हणून कार्यरत आहे. मी कनिष्ठ अभियंता असल्याचे कागदपत्र सोबत आणले कारण समंस मध्ये तसे नमूद नव्हते. मी आज सोबत अशोक चरपे यांच्या प्रकरणाची मुळ नस्ती आणली आहे.

५.		प्रारंभ प्रमाणपत्र व मंजूर नकाशा या व्यतीरिक्त मुळ नस्ती मध्ये अशोक चरपे यांची खरेदी खताची प्रत, टॅक्स पावती, सिटी सरवे प्रकरण दाखल केल्याची पोच, सिटी सरवे चा नकाशा, बांधकामाच्या नियोजीत नकाशाची प्रत व टॅक्स असेसमेंट पावती ही कागदपत्रे सोबत आणली आहे.

६.		हे खरे आहे की, प्रारंभ प्रमाणपत्र व मंजूर नकाशा यास प्रतीवादी क्रं. १ ते ३ यांनी हरकत घेतली होती. साक्षदार सांगतात परवानगी नंतर घेतली होती. प्रतीवादी क्र. १ ते ३ यांनी दिनांक २५/०४/२०१३, ०४/०५/२०३, २७/०६/२०१३, ०४/०७/२०१३ व २६/०७/२०१३ या तारखांना घेतलेल्या आक्षेपांचा अभिलेख नगरपरिषद येथे उपलब्ध आहे. सदर अभिलेख मी आज सोबत आणला नाही. त्याचे कारण म्हणजे साक्ष समंस मध्ये त्याबाब नमूद नव्हते.

७.		सदर आक्षेप अर्जानुसार नगरपरिषद, सावनेर ने संबंधीतांना नोटीस पाठविले होते. सदर नोटीस अशोक चरपे यांना बांधकाम थांबविण्या संदंर्भात होते. हे खरे आहे की, नगरपरिषदेने नोटीस देऊनही अशोक चरपे यांनी बांधकाम थांबविले नव्हते. हे खरे आहे की, नगरपरिषद ने दिनांक २८/०६/२०१३ रोजी जा.क्र. ६३० अन्वये पहिली नोटीस बांधकाम थांबविण्यासंदर्भात अशोक चरपे यांना दिली होती. एखाद्या व्यक्तितस बांधकाम परवानगी असल्यास नगरपरिषद त्या व्यक्ती कडून, त्यांच्या मालकीचे खरेदी खताची प्रत, बांधकामाचा नियोजीत नकाशा, बांधकामाचा फार्म, टॅक्स असेसमेंट, सिटी सरवे येथे फेरफार करिता प्रकरण त्या व्यक्ती ने दाखल केले असल्यास त्याची पोच ही कागदपत्रे घेत असतो. हे म्हणणे खरे नाही की, अशोक चरपे यांनी सिटी सरवे कार्यालयात प्रकरण दाखल केल्याची पोच आम्हाला दिली नाही. हे म्हणणे खरे नाही की, अशोक चरपे यांच्याकडे फेरफार नसल्यामुळे आम्ही त्यांची बांधकाम परवानगी रद्द केली होती. अशोक चरपे यांचे मंजूर नकाश्याप्रमाणे बांधकाम दिसून आले नाही म्हणून दिनांक १०/०७/२०१४ रोजी त्यांची बांधकाम परवानगी तात्पुरती स्थगीत केली होती.

८.		अशोक चरपे यांनी मंजूर बांधकाम नकाशापेक्षा किती क्षेत्रावर जास्तीचे बांधकाम केले होते ही बाब मला कागदपत्र बघीतल्या शिवाय सांगता येणार नाही. सर्व कागदपत्र नगरपरिषद, सावनेर येथे उपलब्ध् आहेत. ती कागदपत्रे मी आपण सांगाल त्या तारखेला आणण्यास तयार आहे.

(यावेळी प्रतिवादीच्या वकिलांनी पुढील तारखेपर्यंत उलटतपास तहकूब करण्याची विनंती केली आहे. यावेळी वादीचे वकिलांनी असा आक्षेप घेतला की, प्रतिवादीनां काही कागदपत्र पटलावर आणायची असल्यास त्यांनी साक्षदारास स्वतंत्र समंस काढून तपासावीत. त्याचप्रमाणे त्या कागदपत्राची प्रमाणीत प्रत काढून ती सादर करावी. सदर प्रकरणातील मुद्दे पाहता वादी यांनी मंजूर नकाशापेक्षा जास्तीचे बांधकाम केले आहे काय असा मुद्दा गठीत केलेला आहे. त्यामुळे अतिक्रमणासंदर्भात पुरावा साक्षीदारामार्फत पटलावर येत असल्यास त्याचे नुकसान वादीला होणार नाही व त्याच मुद्दाकरिता प्रतीवादीनां त्याच साक्षीदाराला बोलविणे योग्य व न्यायाचे होणार नाही. सबब

उलटतपास पुढील तारखेपर्यंत कागदपत्रे सादर करण्याच्या मुद्द्यावरुन तहकुब करण्यात येते.)

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्विकृती

समक्ष

दिनांक –०४.०२.२०२३.

(आर. बी. कुलकर्णी)

२ रे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर

तथा प्र. श्रे. न्या. दं., सावनेर.

**<u>C e r t i f i c a t e</u>**

I affirm that the contents of this PDF evidence are same word to word, as per the original evidence.

Name of Clerk :- P. R. Zodape.